प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे: समीक्षा



संपादक
डॉ. विलास विठ्ठल नाबदे

Scanned with OKEN Scanner

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

:: संपादक ::

**डॉ. विलास विठ्ठल नाबदे**

सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
अहमदनगर महाविद्यालय, अ.नगर

**पुनम पब्लिकेशन**

१२३/१, बी–ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा, दिल्ली – ११० ०५३

Scanned with OKEN Scanner

**भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा**

ISBN : 978-93-93366-04-7

© संपादक

**प्रकाशक :**
सौरभ सिंग
**पुनम पब्लिकेशन**
१२३/१, बी-ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा,
दिल्ली - ११० ०५३

**टाईपसेटींग :**
दिनेश बोरीकर
डाटा-लाईन कॅम्प्युटर्स,
५८३, हंसापूरी, छोटी खदान, नागपूर- १८.
मो. ९३७११५०४६७

**मुद्रक**
पुनम पब्लिकेशन
दिल्ली - ११० ०५३

किंमत : **११०० रुपये**

---

(ग्रंथातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | लोकशाही संकटात आहे का? भारताचा अनुभव काय सांगतो? | - डॉ. विठ्ठल ढशिकळे | १ |
| २. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने - "भय इथले संपत नाही." | - गणेश महादेव सातपुते | १६ |
| ३. | भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : स्थित्यंतरे आणि वाटचाल | - सविता तानाजी घोगरे | २० |
| ४. | भारतीय लोकशाही - संविधान- एक सर्वांगिण शिक्षण ..... | - अश्विन संपत पोटे | २६ |
| ५. | भारतीय संसदीय लोकशाही-आव्हाने आणि उपाय | - डॉ. भागवत शंकर महाले | ३० |
| ६. | भारतीय लोकशाही : वाटचाल आणि भवितव्य | - ममता जयराम इंदापुरे | ३८ |
| ७. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - भोये सुरेश मुरलीधर | ४२ |
| ८. | भारतीय लोकशाही व मतदार वर्तन | - दिपक बुधवंत | ४८ |
| ९. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - जमीर मुम्मन इनामदार | ५९ |
| १०. | भारतीय संविधानाची मूलभूत चौकट | - डॉ. काळे संजय अंकुश | ६६ |
| ११. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - डॉ. शेख वहिदा अब्दुल रज्जाक गीतांजली शंकरराव चव्हाण | ७३ |
| १२. | भारतीय लोकशाही व मतदाराचे वर्तन | - शिवलाल कांतीलाल शिंदे | ७८ |
| १३. | भारतीय लोकशाही आणी मतदार वर्तन | - मोहिनी पांडुरंग झिंजुर्डे | ८२ |
| १४. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - गायत्री गणेश राऊत | ८४ |
| १५. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - प्रा. डॉ. राजकुमार रिकामे - चंचल मट्टू | ८८ |
| १६. | भारतीय लोकशाही पुढील समकालीन आव्हाने | - नकुल पोपट खवले | ९७ |
| १७. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - दाते सुप्रिया सिताराम | १०२ |
| १८. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - डॉ. रविराज अंबादास वटणे | १०७ |
| १९. | आर्थिक लोकशाहीची गरज : आव्हाने आणि भवितव्य | - डॉ. संदीप इरोळे | ११० |
| २०. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - महालक्ष्मी सुभाष ठुबे | ११९ |
| २१. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - नवनाथ विठोबा नागरे | १२३ |
| २२. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - रवी साहेबराव गायकवाड | १२६ |
| २३. | भारतीय लोकशाहीची आव्हाने: संरक्षण- धोरणातील बदल आणि भविष्य | - डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | १३० |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ४६. भारतीय लोकशाही राष्ट्रीय नेतृत्व:महात्मा गांधीचे योगदान | - | डॉ. दिगंबर बिरादार | २८३ |
| ४७. लोकशाहीत वृत्तपत्राचे स्थान | - | अर्चना रमेश पगार | २८९ |
| ४८. भारतीय लोकशाहीची बलस्थाने | - | शशिकांत भालचंद्र पाटील | २९३ |
| ४९. भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | ठाकरे ज्ञानेश्वर दिनकर<br>प्रा. डॉ. ज्योती बिडलान | ३०१ |
| ५०. भारतीय लोकशाहीचा प्रवास | - | डॉ. संजय मराठे | ३०७ |
| ५१. भारतीय लोकशाही शासन पध्दतीचा अभ्यास | - | संभाजी संतोष पाटील | ३१० |
| ५२. भारतीय लोकशाहीचे वास्तव व भवितव्य | - | डॉ. संजय लांडगे | ३१६ |
| ५३. भारतीय लोकशाही आणि सामाजिक परिणाम | - | श्रद्धा सुरेश शेळके | ३२० |
| ५४. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | जब्बार खलील शेख | ३२४ |
| ५५. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने : सांप्रदायिक दहशतवाद | - | गणेश बाळासाहेब मोरे | ३३० |
| ५६. भारतीय लोकशाही आणि राजकारण | - | डॉ. काळे संजय अंकुश<br>नवले गायत्री परसराम | ३३४ |
| ५७. भारतीय लोकशाही व नागरिकांचे घटनात्मक अधिकार | - | अनिल निवृत्ती डगळे | ३३९ |
| ५८. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने : एक वास्तविकता | - | डॉ. विलास सदाफळ | ३४५ |
| ५९. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने | - | प्रा. शिवाजी रावसाहेब नेटके | ३४८ |


**ENGLISH**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. Genesis of Maratha Kranti Morcha | - | Dr. Ankush P. Aware | ३५३ |
| 2. Electoral Reforms : Contemporary Necessitate in Indian Democracy | - | Dr. Meenal K. Kshirsagar | ३६१ |
| 3. "India's 75 Years of Independence" | - | Dr. Shivaji G. Dhokane | ३६९ |
| 4. Challenges Before Indian Democracy | - | Anirudha B. Jadhav | ३८५ |
| 5. Challenges to Indian Democracy | - | Pradip B. Jankar | ४०० |
| 6. Democracy and Globalization in India | - | Dr. Avinash V. Salve | ४०४ |
| 7. Decline Of Democratic Values And Civil Liberty of India | - | Parveen Naser Qureshi | ४०७ |
| 8. Indian Democracy and Constitutional Movement | - | Shabana Shaikh | ४०३ |
| 9. Democratic Political Values in Indian Constitution | - | Dr. Ashok Ramsing Vasave | ४२० |
| 10. Indian Democracy and Constitutional Movements | - | Prof. Jyoti Badlan | ४२६ |




Scanned with OKEN Scanner

:: ४७ ::

# लोकशाहीत वृत्तपत्राचे स्थान

अर्चना रमेश पगार
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला,
भगवंतराव वाजे, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
सिन्नर.जि.नाशिक

**प्रस्तावना :**

लोकशाहीच्या जिवंतपणाचे एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे वृत्तपत्र स्वातंत्र्याची स्थिती एखाद्या सजीवांसाठी श्वसनाचे जे महत्व असते तेच महत्त्व लोकशाही व्यवस्थेत वृत्तपत्र स्वातंत्र्याचे असते.

लोकशाही राज्यव्यवस्थेची इमारत कायदेमंडळ, राज्य शासन, न्यायव्यवस्था व पत्रकारीता या चार आधारस्तंभावर उभी असते. ही कल्पना प्रथम मेकॉलने १८२८ मध्ये आपल्या कॉन्स्टिट्यूशनल हिस्ट्री या निबंधात मांडली. लोकशिक्षण हे तर वृत्तपत्रांचे जीवन ध्येयच आहे. इ.स. १८३२ मध्ये लोक जागृतीसाठीच बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिले मराठी वृत्तपत्र काढले. त्याचे नाव होते दर्पण. दर्पण म्हणजे आरसा. तत्कालीन समाज स्थितीचे हुबेहूब दर्शन घडवून, निद्रिस्त समाजाला जागे करावे, हाच यांच्या संपादकाचा हेतू आणि येथुन पुढे प्रत्येक वेळी वृत्तपत्र लोकशिक्षणाचे, समाजप्रबोधनाचे महत्कार्य करीत राहिले. ज्याप्रमाणे स्वातंत्र्याच्या वेळी सामान्यजणांच्या मनात वृत्तपत्रांनी देशभक्तीची भावना निर्माण केली. त्याचप्रमाणे यशस्वी लोकशाहीसाठी आदर्शलोक,प्रजाजन निर्माण करण्याचे कामही वृत्तपत्रे करीत असतात. प्रत्येक माणसाला त्याच्या हक्काची आणि कर्तव्याची जाणीव वृत्तपत्रे करून देतात. सर्वसामान्य माणूस वर्तमानपत्रे निश्चितच वाचत असतो. त्यामुळे वर्तमानपत्र हे फार मोठे लोकशिक्षणाचे काम करीत असते. स्वातंत्र्योत्तर काळातही गोवा मुक्ती, महाराष्ट्र निर्मितीचा संघर्ष अशावेळी वृत्तपत्रांनी फार मोठी कामगिरी बजावली आहे. लोकशाही राज्यपद्धतीत मतदानाला फार महत्त्व आहे. अशावेळी विविध पक्षाचे धोरण लोकांसमोर मांडून त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्यही वृत्तपत्रे करतात.

**वृत्तपत्रे :**

आधुनिक काळात लोकमताला राजकीय जीवनात महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक शासनाला लोकमताची दखल घ्यावीच लागते. कारण कोणत्याही शासनाला लोकांचा फार मोठ्या प्रमाणात विरोध असेल तर ते शासन स्थिर राहू शकत नाही. लोकशाहीत तर लोक मताचे महत्त्व निर्विवाद आहे. लोकशाहीत लोकमताचा पाठिंबा हा शासनाचा आधार असतो. शासन लोकांना जबाबदार असल्यामुळे लोकांची इच्छा लक्षात घेऊनच शासनाला आपले धोरण ठरवावे लागते. आधुनिक काळात राजकीय प्रश्नाबाबत लोकांमध्ये ही जी जागृती दिसून येते, त्याला काही घटक कारणीभूत

Scanned with OKEN Scanner

ठरलेले आहेत. आधुनिक काळात शिक्षणाचा प्रसार झाला. सर्वसामान्य माणूस जो शिक्षणामुळे मुद्रणकलेच्या उदयामुळे आणि विकासामुळे वृत्तपत्रे निघू लागली. आणि त्यांच्या मार्फत लोकांना राजकीय घडामोडी समजू लागल्या. राजकीय प्रश्नाबाबत त्यांच्यात औत्सुक्य आणि जाणकारी निर्माण झाली. लोकशाहीच्या विकासाबरोबर मतदार वर्गाचा विस्तार झाला. अधिकाधिक लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळू लागली. यामुळे राजकारण ही काही लोकांची मक्तेदारी न राहता, लोकांच्या इच्छा-आकांक्षांचा प्रभाव राजकारणावर पडू लागला.

सार्वजनिक प्रश्नांची माहिती लोकांना करून देण्याबाबत आणि लोकमत घडविण्याबाबत वृत्तपत्रांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आज माहिती देणारी अनेक साधने उपलब्ध असूनही वृत्तपत्रांचे महत्त्व जराही कमी झालेले नाही. जगातील विकसित तसेच अविकसित देशात वृत्तपत्र हेच लोकमत घडवणारे सर्वात प्रभावी माध्यम म्हणून आपले स्थान टिकवून आहे. व्यक्ती आपल्या आवडीप्रमाणे वृत्तपत्राची निवड करू शकते तसेच सवडीप्रमाणे त्यांचे वाचन करू शकते. शिवाय वृत्तपत्रात बातम्या दिलेल्या असतात. त्या बातम्यांचा अन्वयार्थ लावलेला असतो. आणि संपादकीय लेखातून त्याबाबत निष्कर्ष ही काढलेले असतात. म्हणजे वृत्तपत्र केवळ माहिती देत नाही, तर त्या माहितीच्या आधारे लोकांसमोर तयार मतच सादर करत असतात. लोकमत घडवण्यामध्ये असणारे महत्त्व जाणून अनेक विचारवंत राजकीय नेते आपल्या उद्दिष्टांचा प्रचार करण्यासाठी वृत्तपत्रांचा आधार घेताना दिसून येतात. काही राजकीय पक्षांच्या ध्येय धोरणाचा प्रचार केला जातो.

**लोकशाहीत वृत्तपत्राचे महत्त्व :**

लोकशाही देशात वृत्तपत्रांना विशेष महत्त्वाचे स्थान असते. देशात वृत्तपत्र ही बहुदा शासनाच्या किंवा शासन नियंत्रित अशा संस्थांच्या मालकीचे असतात. स्वभाविकच त्यांचा वापर शासनाच्या धोरणाचा प्रचार करण्यासाठी केला जातो. शासनाच्या धोरणांचे समर्थन करणाऱ्या आणि त्याला पोषक ठरणाऱ्या बातम्या दिल्या जातात. अशा परिस्थितीत वृत्तपत्र ही शासनावर नियंत्रण ठेवणारे साधन न राहता सत्ताधीशांचे समर्थन करणारे साधन बनते. अशा परिस्थितीत समाजातील विविध मतप्रवाह आणि लोकमानस वृत्तपत्रातून मुक्तपणे व्यक्त होत नाही. वृत्तपत्रातून विविध मतप्रवाह आणि लोकमानस आणि विविध मतप्रवाह व्यक्त होण्यासाठी तसेच वृत्तपत्रांचे कार्य निस्पृहपणे आणि निर्भीडपणे चालावे यासाठी वृत्तपत्र स्वातंत्र्य आवश्यक असते. लोकशाहीत असे स्वातंत्र्य वृत्तपत्रांना देण्यात आलेले असते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीत एक मूलभूत स्वातंत्र्य मानले जाते. या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर शासनाकडून अतिक्रमण होण्याची शक्यता लक्षात घेऊन या स्वातंत्र्याला कायदेशीर संरक्षण देण्यात आलेले असते.

वृत्तपत्रे समाज शिक्षणाचे काम फार पूर्वीपासून करीत आहेत. आगरकरांनी समाजाचा रोष पत्करून सुधारक चालविला. आजही समाजात घडणाऱ्या इष्ट अनिष्ट गोष्टींची नोंद वृत्तपत्रे घेत आहेत. मुंड्याची अनिष्ट चाल मानव जातीला काळीमा फासणारा स्त्रियांचा चालणारा बाजार, सामाजिक विषमता या समाजाला घातक ठरणाऱ्या गोष्टींना वाचा फोडली. वृत्तपत्रांनीच ! सर्वसामान्य माणूसही आपले विचार वृत्तपत्र वाचकांसाठी असलेल्या सदरातून मांडू शकतो. अशाप्रकारे वृत्तपत्र राष्ट्र घडवते म्हणजेच ओघाने समाजातील प्रत्येक माणूस घडवीत असते. वृत्तपत्र वाचनाने आपल्याला साऱ्या जगातील घटना समजतात. भोवतालचे नैसर्गिक बदल कळतात. वस्तूंच्या भावनातील चढ-

उतार, मानवी स्वभावाचे नमुने, उत्कृष्ट साहित्य, नवे विचार या आणि अशा इतर अनेक गोष्टी वृत्तपत्र आपल्यापर्यंत पोहोचवते. वृत्तपत्रांमुळे ज्ञान प्राप्ती होते.

**वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ :**

कायद्याची अधीसत्ता स्वतंत्र आणि निष्पक्षपाती न्यायव्यवस्था जागृत लोकमत हे ज्याप्रमाणे लोकशाहीच्या आधारस्तंभ मानले जातात. त्याप्रमाणे वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानला जातो. लोकशाहीत सार्वत्रिक निवडणुकी द्वारे प्रतिनिधी निवडणे आणि त्यांच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे सुपूर्द करणे, एवढा पुरताच लोकांचा राजकीय सहभाग अपेक्षित नसतो. तर शासन आणि जनता यात सतत संसूचन चालू राहणे अपेक्षित असते. देश-विदेशातील दैनंदिन राजकीय आणि इतर घडामोडींची वस्तुनिष्ठ माहिती लोकांना मिळाली पाहिजे. राष्ट्रीय तसेच स्थानिक स्वरूपाचे महत्त्वाचे प्रश्न, विविध राजकीय मतप्रवाह, शासनाचे धोरण याबाबतची माहिती लोकांना मिळाली पाहिजे. आणि त्या आधारे विविध प्रश्नाबाबत त्यांना स्वतःचे मत बनविता आले पाहिजे. याचबरोबर लोकांचे विविध प्रश्न त्यांच्या तक्रारी यांची जाहीर चर्चा होऊन त्यांची माहिती शासनापर्यंत पोहोचली पाहिजे. संसूचनाचे हे कार्य करणारे वृत्तपत्रे हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्रातून दैनंदिन घटनांची माहिती लोकांना मिळतेच पण त्याचबरोबर विविध विषयावरील लेख, अग्रलेख, देश परदेशातील घटनांचे विश्लेषण यातून विविध प्रश्नांची चर्चा वृत्तपत्रातून होत असते.

लोकमत घडवण्यामध्ये वृत्तपत्रांना असणारे महत्व लक्षात घेता, राज्यकर्त्यांनाही वृत्तपत्रातून मांडल्या जाणाऱ्या मतांची दखल घेणे भाग असते. राज्यकारभारातील भ्रष्टाचार शासनाच्या धोरणातील चुका उघडकीला आणण्याचे कार्य वृत्तपत्रे करू शकतात. तसेच देशासमोरील एखाद्या ज्वलंत प्रश्नाबाबत लोक जागृती घडून आणण्याचे कार्यही करू शकतात. वृत्तपत्रांनी असे कार्य केल्याची अनेक उदाहरणे आहेत. वृत्तपत्रांनी लोकांना अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती पुरवली निर्भीडपणे आणि निष्पक्षपातीपणे मते व्यक्त केली. तर दैनंदिन घडामोडींचे ज्ञान लोकांना करून देण्याबाबत ती मौलिक कार्य करू शकतात. पण अनेकदा वृत्तपत्रांकडून ही अपेक्षा पूर्ण होत नाही, याला अनेक कारणे आहेत. वृत्तपत्रांची मालकी कुणाकडे हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. लोकशाही देशात वृत्तपत्रे खाजगी मालकीची असतात. पण वृत्तपत्रे चालवणे ही अत्यंत खर्चिक बाब असल्यामुळे वृत्तपत्रांची मालकी बहुधा भांडवलदार वर्गाकडे असते. अनेकदा एखाद्या वृत्तपत्र संस्थेची साखळी वृत्तपत्रे असतात. म्हणजे एका संस्थेची अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके असतात. अशा वृत्तपत्रांचा दृष्टीकोन भांडवलदार वर्गाच्या हिताचे रक्षण करणारा असतो. अशा वृत्तपत्रातून बातम्या, वृत्ती, मजकूर या विशिष्ट दृष्टीकोनाचे समर्थन करण्याच्या हेतूने देण्यात येत असतो. काही वृत्तपत्रे राजकीय पक्षाचे मुखपत्र म्हणून चालवली जातात. त्यामधून विशिष्ट राजकीय पक्षांच्या धोरणांना पोषक ठरतील अशा पद्धतीने बातम्या दिल्या जातात.

**समारोप :-**

वृत्तपत्रांच्या मालकीबरोबरच बातम्या पुरविणाऱ्या संस्था कुणाच्या नियंत्रणाखाली आहेत, हा प्रश्नही महत्त्वाचा असतो. देश विदेशातील बहुतेक बातम्या या प्रस्थापित अशा वृत्त संस्थांकडून वृत्तपत्रांना पुरविल्या जातात. या वृत्तसंस्था विशिष्ट हितसंबंधी गटाच्या नियंत्रणाखाली असतील तर त्या गटांच्या हितसंबंधांना पोषक ठरतील अशाच पद्धतीने बातम्या पुरवल्या जातील हा धोका

असतो. वृत्तपत्रांचे संपादक, उपसंपादक, वार्ताहर यांची भूमिका ही महत्त्वाची असते. विविध गटांकडून होणाऱ्या दडपणांना न जुमानता निर्भीड, निस्पृह, आणि निरपेक्ष वृत्तीने वृत्तपत्रे चालवणारे संपादक जनसेवेचेच कार्य करत असतात. वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी वृत्तपत्रातील मजकूर बातमी आकर्षक पद्धतीने सादर करावे लागतात. पण ही मर्यादा सोडून काही वृत्तपत्रे आपला खप वाढवण्यासाठी भडक, अतिरंजित पद्धतीने बातम्या देतात. लोकांच्या भावना चेतविणारा मजकूर सादर करतात. सनसनाटी निर्माण करण्याच्या हेतूने, बदनामीकारक मजकूर दिला जातो. हा वृत्तपत्र स्वातंत्र्याचा गैरवापर होय. वृत्तपत्रे हे दुधारी अस्त्र आहे. त्याचा वापर लोकशिक्षणासाठी होऊ शकतो. तसेच लोकांची दिशाभूल करण्यासाठी त्यांच्या भावना चेतवण्यासाठीही केला जाऊ शकतो. यासाठी लोकशाहीत वृत्तपत्रांनी काही आचारसंहिता पाळणे, संयमी आणि समतोल वृत्तीने या माध्यमांचा वापर करणे आवश्यक असते.

**संदर्भसुची:–**


१. भारतीय राजकीय व्यवस्था लेखक प्रा. र. व. वराडकर.
२. भारतीय संविधानाची ओळख लेखक– डॉ. शुभांगी दिनेश राठी अथर्व पब्लिकेशन्स
३. httpst//wwwesakal.com
४. httpst//vishwakosh marathi.gov..in


□□□

Scanned with OKEN Scanner